# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला

**वाचा:-**

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.एजीए/१९९५/सीआर/१००/१८-अे, दि.२१ सप्टेंबर, १९९९.
२. शासन निर्णय क्र.वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३ दि. २० जुलै, २००१.
३. शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.९/प्र.क्र.४१ सेवा-३ दिनांक ५ जुलै, २०१०.
४. शासन निर्णय क्रमांक:आप्रयो/१०१४/प्र.क्र.२१/सेवा-३ दिनांक ६ सप्टेंबर, २०१४.
५. विद्यापीठ नियंत्रक कार्यालयाचा अभिप्राय दि.२६.११.२०२५.

**जा.क्रवीईए/आस्था./सु.से.आ.प्र.यो/प.प/** ~~१३१~~ /1305 **दि.०३ जुलै, २०२६**

**प्रस्तावना-**

संदर्भ क्र.२ वरिल शासन निर्णयानुसार "क" व "ड" (वर्ग ३ व ४) मधिल कर्मचा-यांना पदोन्नतची संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी वेतनश्रेणी रु.२०००- ३२०० (पाचव्या आयोगातील वेतन संरचनेनुसार) पर्यंतच्या कर्मचा-यांना लागु होती, सदर कालबध्द पदोन्नती योजना बंद करुन सुधरित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही रु.८०००-१३५०० (पाचव्या आयोगातील वेतन संरचनेनुसार) व त्याहुन कमी वेतन घेणा-या कर्मचा-यांना दि.०१ ऑगष्ट, २००१ पासुन लागु करण्यात आली आहे.

विद्यापीठाद्वारे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ प्रदान करण्याकरिता "अ" ते "ड" संवर्गातील निवड समित्यांचे तसेच "इतर अधिकारी" संवर्ग निवड समित्यांचे वेळोवेळी आयोजन करुन संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना सदर योजनेचा लाभ प्रदान करण्याकरिता कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर कार्यवाही करतांना उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमुद शासन निर्णयाप्रमाणे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दिनांक ०१ ऑगष्ट, २००१ पासुन लागु करणे अपेक्षित आहे, तथापि विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामध्ये काही अधिकारी/ कर्मचारी यांना सदर लाभ त्यांना एकाच पदावर सतत १२ वर्षाची सेवा पुर्ण झाल्याच्या दिनांकापासुन म्हणजे दिनांक ०१ ऑगष्ट, २००१ पुर्वी पासुन प्रदान करण्यात आले असल्याचे नियंत्रक कार्यालयाचे निदर्शनास आले आहे. तसेच सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ प्रदान करतांना त्यानुसार दुस-या लाभाची गणना करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिनांक ०१ ऑगष्ट, २००१ पासुन प्रदान करण्याची दुरुस्ती करण्याबाबत खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

## परिपत्रक

**जा.क्रवीईए/आस्था./सु.से.आ.प्र.यो/प.प/**1305 **दि.०३ जुलै, २०२६**

उपरोक्त संदर्भ क्र.२ वर नमुद शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००१ चे परिच्छेद क्र.५ चे अनुषंगाने, विद्यापीठ नियंत्रक कार्यालयाच्या अभिप्रायानुसार विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी, ज्यांची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० (पाचव्या आयोगातील वेतन संरचनेनुसार) व त्याहुन कमी आहे, अश्या अधिकारी/कर्मचारी यांना १२ वर्षाची सतत सेवा पुर्ण झाल्यानंतर सदर योजनेचा लाभ दि.०१ ऑगष्ट,

२००१ पुर्वी अनुज्ञेय करण्यात आला असल्यास, सदर लाभाची गणना दिनांक ०१.०८.२००१ पासुन दुरुस्त करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची दि.०१.०८.२००१ पासुन पुन:श्च वेतननिश्चिती करण्यात यावी, तसेच संबंधितांना त्या अनुषंगाने दुसरा लाभ दि.०१.०८.२००१ नंतर १२ वर्ष पुर्ण झाल्यानंतर अनुज्ञेय करुन (अनुज्ञेय असल्यास) सदर प्रकरण विद्यापीठ नियंत्रक कार्यालयास पडताळणीकरिता सादर करण्यात यावे.

उपरोक्त परिपत्रक विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असुन, त्यानुसार वेतन अतिप्रदान झाले असल्यास त्याचे वसुलीबाबत सर्व संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांचे स्तरावरुन त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

मा. कुलगुरूच्या मंजुरी व आदेशानुसार.

**स्वाक्षरित/-**
**कुलसचिव,**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला**

**प्रतिलिपीः**

१. अधिष्ठाता, कृषि/उद्यानविद्या/कृषि अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.
२. संचालक, संशोधन/विस्तार शिक्षण, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व) ..........................................................................
४. विभाग प्रमुख, (सर्व) ..................................................................................
५. प्रभारी अधिकारी/प्राचार्य(सर्व)...........................................................................
६. विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल/विद्यापीठ नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.
७. मा.कुलगुरूंचे स्विय सहायक/कुलगुरूंचे स्विय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.
८. उपकुलसचिव (आस्था/साप्रवि), डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.
९. ----------------------------------------------------------------------------------

**उपकुलसचिव (आस्था.),**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला**